		सुनावणीचा दि.23.04.2026		वेळ सकाळी 10.30 वा.	
अ.क्र.	अपील क्र.	अपीलार्थीचे नाव व पत्ता	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी	शेरा
1	453/2025	श्री. भरत बाबुराव डिडोरे, रा. प्लॉट नबंर 3/4, हर्सुल पिसादेवी रोड, पिसादेवी छत्रपती संभाजीनगर	सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर	
2	1767/2025	श्री. संजय महादु जंगले, रा. गट क्र. 166, ठवारावीत क्र. 123, मु.पो चिंचोली (नकीम), ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर	
3	4621/2025	श्री. रामदास गोंडाजी सुरडकर, रा. वाघलगांव ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वाघलगाव ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचयात समिती फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	
4	5565/2025	श्री. अशोक वामनराव बनकर, रा. राधास्वामी कॉलनी, एकतानगर, हर्सुल छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	
5	5772/2025	श्री. सुभाष परभराव खमाट, रा. उमरवती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	
6	5773/2025	श्री. सुभाष परभराव खमाट, रा. उमरवती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय उमरावती ता.फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	
7	3347/2025	श्री. सुभाष परभतराव खमाट, मु. उमरावती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	
8	3356/2025	श्री. सुभाष परभतराव खमाट, मु. उमरावती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उमरावती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर	
9	5193/2025	श्री. सुभाष परभतराव खमाट, रा. उमरावती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय उमरावती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर	
10	5194/2025	श्री. सुभाष परभतराव खमाट, रा. उमरावती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय उमरावती ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर	
		सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी		लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी	

		सुनावणीचा दि.23.04.2026		वेळ सकाळी 10.30 वा.	
अ.क्र.	अपील क्र.	अपीलार्थीचे नाव व पत्ता	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी	शेरा
11	1038/2025	श्री. सोमिनाथ नारायण सोनवणे, रा. साईनगर चितेगाव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खामगाव ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	
12	1905/2025	श्री. सोमिनाथ नारायण सोनवणे, रा. साईनगर चितेगाव पैठण रोड ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. गोरक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खामगाव (गोरक्ष), ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, गोरक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खामगाव (गोरक्ष), ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	
13	298/2025	श्री. शेख तुफेल अख्तर लुतुफुर रहेमान, रा. गिलपलटन गल्ली कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापिका, सारा इंग्लिश स्कुल कन्नड ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
14	1992/2025	श्री. खंडु बाबुलाल मुगले, मु.पो. वाराडी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय वाराडी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
15	2238/2025	श्री. साहेबराव सिताराम राठोड, रा. घुसुरतांडा ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
16	2239/2025	श्री. साहेबराव सिताराम राठोड, रा. घुसुरतांडा ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
17	2240/2025	श्री. साहेबराव सिताराम राठोड, रा. घुसुरतांडा ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
18	2466/2025	श्री. रविंद्र दौलतराव गायकवाड, मु.पो. पळशी (बु), ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय पळशी (बु), ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर	
19	5778/2025	श्री. संदिप साहेबराव पडसवान मु.पो.गुरुकणपुर ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
20	969/2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर	शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर	
		सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी		लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी	

		सुनावणीचा दि.23.04.2026		वेळ सकाळी 10.30 वा.	
अ.क्र	अपील क्र.	अपीलार्थीचे नाव व पत्ता	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी	शेरा
21	1158/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळनेर केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
22	1159/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरकतपुर केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
23	1160/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकी केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
24	1161/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडोद केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
25	1162/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरळवस्ती केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
26	1163/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशपुर केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
27	1164/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळनेर केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
28	1165/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरकतपुर केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
29	1166/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाकी केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
30	1167/ 2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडोद केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
		सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी		लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी	

		सुनावणीचा दि.23.04.2026		वेळ सकाळी 10.30 वा.	
अ.क्र	अपील क्र.	अपीलार्थीचे नाव व पत्ता	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी	शेरा
31	1168/2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तरळवस्ती केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
32	1169/2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07,एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, ता.जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशपुर केंद्र चिंचोली लिंबाजी ता. कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर	
33	1596/2025	श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, रा. फ्लॅट नंबर AB-07, एस.एस. पार्क सावंगी हर्सुल, छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, केंद्रय प्राथमिक शाळा उंडणगांव ता. सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर	
34	55/2025	श्री. रविंद्र दिगंबर शेलार, मु.पो. लोहगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय चितेगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी,पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
35	106/2025	श्री. लखन भिमराव वाहुळे, मु.पो. थेरगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय थेरगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी,पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
36	107/2025	श्री. लखन भिमराव वाहुळे, मु.पो. थेरगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय थेरगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी,पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
37	904/2025	श्री. महादेव सत्यभान ठोके, मु. कोळी बोडखा पो. थेरगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कोळी बोडखा ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
38	924/2025	श्री. महादेव सत्यभान ठोके, मु. कोळी बोडखा पो. थेरगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कोळी बोडखा ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
39	925/2025	श्री. महादेव सत्यभान ठोके, मु. कोळी बोडखा पो. थेरगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कोळी बोडखा ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
40	1835/2025	श्री. वासुदेव बाबाराव गोजरे, मु. वडगाव पो. वडजी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वडजी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
		सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी		लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी	

		सुनावणीचा दि.23.04.2026		वेळ सकाळी 10.30 वा.	
अं.क्र.	अपील क्र.	अपीलार्थीचे नाव व पत्ता	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी	शेरा
41	1983/ 2025	श्री. रविंद्र दिगंबर शेलार,रा. लोहगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
42	2115/ 2025	श्री. कगलाकर देविदास वानोळे,रा. रेणुका देवी गल्ली पैठण ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय चिंचाळा ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
43	2735/ 2025	श्रीमती. आरती सचिन चव्हाण, रा. थपटी तांडा ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय थापटी तांडा ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
44	2890/ 2025	श्री. अंबादास उध्दव कानडे, मु.पो. बागतपुर ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बागतपुर ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
45	3145/ 2025	श्री. अक्षय देविदास भांड, मु.पो. वडजी पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वडजी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
46	3205/ 2025	श्री. रामनाथ एकनाथ केदारे,रा. राहुलनगर (कातपुर), ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ.पंचायत समिती कार्यालय पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
47	3305/ 2025	श्री. अबरार गुलामनबी कुरेशी, रा. नेहरु चौक पैठण ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कारकीन ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
48	3615/ 2025	श्री. लखन भिमराव वाव्हुळे, मु.पो. थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
49	3616/ 2025	श्री. लखन भिमराव वाव्हुळे, मु.पो. थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
50	3617/ 2025	श्री. लखन भिमराव वाव्हुळे, मु.पो. थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
		सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी		लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी	

		सुनावणीचा दि.23.04.2026		वेळ सकाळी 10.30 वा.	
अ.क्र.	अपील क्र.	अपीलार्थीचे नाव व पत्ता	जन माहिती अधिकारी	प्रथम अपीलीय अधिकारी	शेरा
51	3618/2025	श्री. लखन भिमराव वाव्हुळे, मु.पो. थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजी नगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
52	3619/2025	श्री. लखन भिमराव वाव्हुळे, मु.पो. थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय थेरगांव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
53	4909/2025	श्री. ज्ञानेश्वर भागुदास नवथर, रा. इंदेगांव पो. विहामांडवा ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय इंदेग्राव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
54	6064/2025	श्री. सोमनाथ गाच्छिद्र राऊत, रा. लिंबगाव ता. पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचयत कार्यालय लिंबगाव ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
55	4501/2025	श्री. समाधान नारायण काळे, रा. खामगाव ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर	ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	गट विकास अधिकारी, पंचयात समिती पैठण जि.छत्रपती संभाजीनगर	
56	1715/2025	श्री.रायभान किसन उघडे, रा. 140, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर	ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय गुलानी वडगाव ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	विस्तार अधिकारी, पंचायत समिती पैठण जि. छत्रपती संभाजीनगर	
57	2884/2025	श्री. रायभान किसन उघडे,रा. 140, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर	कनिष्ठ प्रशासनअधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर	उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर	
58	0	0	0	0	
59	0	0	0	0	
60	0	0	0	0	
		सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी		लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी	

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १७१५/२०२५

बोर्ड अ.क्र.५६

श्री. रायभान किसन उघडे, — अपिलार्थी
रा.१४०, रामकृपा कॉलनी (म्हाडा), दर्गारोड, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९३७९३७०७१३.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, मुलानी वडगाव,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मुलानी वडगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,श्री. एस.जी.गर्जे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१९.१२.२०२४ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
आपले का. चे नमुना८ नियम ३२(१) मधील नमुद अ.क्र.३६९ मालमत्ता क्र.२५३ मधील मूळ मालक सुर्यभान किसन उघडे यांचे नावावरुन सौ. जानकाबाई रावन नवले यांचे नावे हस्तांतरणासाठीचे नोंदणीकृत (रजिस्ट्री प्रती) शासन सहमती परवाना प्रती, रकाना क्र.२७ मध्ये न्यायालयाचे नावे स्थळ दावा क्रमांक आदेशाची प्रत सदर न्यायालयीन प्रत कार्यालयास सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव व संपूर्ण पत्ता, पत्र प्रत तसेच मासिक सभा दि.२४.०४.२०२० चा ठराव क्रमांक ०७ फेर नं ची संपूर्ण प्रत प्रकरणाच्या संपूर्ण संचीकेसह माहिती न्यायालयीन कामासाठी त्वरीत देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती

अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मी सध्या नवीन रूजू झालो आहे. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्मयान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, १५ दिवसात विनामूल्य माहिती देण्याचे आदेश पारित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मुलानी वडगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6313 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५५६५/२०२५

बोर्ड अ.क्र.०४

श्री. अशोक वामनराव बनकर, — अपिलार्थी
रा. राधास्वामी कॉलनी, एकतानगर, हर्सूल,
ता.जि. छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९५१८७१९०१८.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
पंचायत समिती कार्यालय, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०५.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी दि.२४.०७.२०५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
सन २०२४ ते २०२५ या कालावधीतील फुलंब्री पंचायत समितीच्या माध्यमातून रोजगार हमी योजने अंतर्गत मातोश्री पाणंद रस्ता या नावाने ११९ कामे सुरु केले, त्या कामाची प्रशासकीय मान्यता, मोजमापपुस्तिका, आदी स्वरुपाची माहिती छायांकित प्रतीत प्रमाणित करुन देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले केले की, एकूण १६९ कामे आहेत. अपिलार्थी यांना ११९ पैकी नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे त्यांना माहिती देता आलेली नाही. १५ दिवसाचा कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना माहिती संकलीत करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आतापर्यंत कुठल्याही प्रकारची माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6289 दिनांक : 15/5/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१०६ व १०७/२०२५-०२, ३६१५ ते ३६१९/२०२५एकूण ०७ प्रकरणे
बोर्ड क्र.३५ व ३६, ४८ ते ५२

श्री. लखन भिमराव वाहुळे, — अपिलार्थी
मु. पो. थेरगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर ९७६६९९१०४०.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, थेरगांव,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०७.०१.२०२५ (०२) दि.०५.०८.२०२५ (०५) रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण सात द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड अ.क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जातील विषय/ तपशिल
३५	१०.०७.२०२४	०१०६/२०२५	दि.०१ जानेवारी २०२४ ते १० जुलै २०२४ या कालावधीतील थेरगाव ग्रामपंचायत अंतर्गत चालू असलेले ट्रॅक्टर संख्या किती ? एका दिवसाला सर्व मिळून पाण्याच्या खेपा किती ? किती लिटर पाणी ट्रॅक्टरचे लॉकबुक सत्यप्रत वरील कालावधीची ट्रॅक्टर खेपा पंचनामा झेरॉक्स मिळणेबाबत.
३६	२३.०९.२०२४	०१०७/२०२५	जानेवारी २०२४ ते सप्टेंबर २०२४ पर्यंत जिल्हा परिषद शाळा थेरगाव यांना ग्रामपंचायत अंतर्गत मंजूर झालेला निधी किती व तो कसा खर्च केला याचा तपशील मिळावा, खर्चाची बीले फोटो सत्यप्रत मिळावी," तहसील

			व पंचायत समितीमार्फत दिलेला निधी किती ? व कसा पुढे खर्च केला याचा तपशील मिळावा.
४८	१६.०१.२०२५	३६१५/२०२५	श्रीमती मडके एम.एम. थेरगांव ग्रामपंचायत येथे कर्तव्यावर हजर असलेल्या कालावधीत त्यांनी घेतलेली सर्व मासिक सभाचा इतिवृत्तांत व सभेस उपस्थित सहया ग्रामस्थ यांच्या उपस्थितीची नोंद असलेली सहयाची झेरॉक्स प्रत मिळावी.
४९	१६.०१.२०२५	३६१६/२०२५	श्रीमती मडके एम.एम. तत्कालीन ग्रामसेवक थेरगांव, यांनी त्यांच्या थेरगांव ग्रा. प. मधील कर्तव्य कालावधीत एकूण किती ग्रामपंचायत कर वसुल केला त्याच्या पावत्या मिळाव्यात व जमा केलेल्या करांमधून कोठे व कसा खर्च केला त्याच्या पावत्या मिळाव्यात, सर्व पावती बुकाचे झेरॉक्स मिळावे.
५०	१६.०१.२०२५	३६१७/२०२५	दि.२७.१२.२०२४ रोजीची ग्रामसभा कार्यालयाने घेतलेल्या ग्रामसभेस उपस्थित असलेल्या सदस्य व ग्रामस्थ यांचा उपस्थिती दर्शविणारे रजिस्टर झेरॉक्स मिळावी.
५१	१६.०१.२०२५	३६१८/२०२५	१. ग्रामसभा नोटीस कधी काढावी. २. नोटीस काढल्यानंतर ग्रामसभा किती दिवसानंतर घ्यावी. ३. ग्रामसभेस किती ग्रामपंचायत सदस्य उपस्थित असावेत. ४. ग्रामसभेस किती ग्रामस्थ/नागरीक उपस्थित असावेत, या विषयी सविस्तर असलेल्या मार्गदर्शक सूचना मिळाव्यात.
५२	१६.०१.२०२५	३६१९/२०२५	श्रीमती मडके एम एम तत्कालीन ग्रामसेवक, थेरगांव हया ग्रामपंचायत कार्यालय थेरगाव येथे हजर झाल्यापासून कार्यमुक्त होईपर्यंत त्यांनी थेरगाव ग्रामपंचायत मध्ये घेतलेल्या सर्व ग्रामसभा ठराव व ठरावास उपस्थित असलेल्या सदस्य व ग्रामस्थ हयाच्या सहया असलेल्या रजिस्टरची सत्यप्रत मिळावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती मिळालेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करुन देण्यात येत होती. एक दिवस विलंब झाल्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आज रोजी अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आपल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या सर्व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागितलेली माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना देण्याचा प्रयत्न केला असता अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास

नकार दिलेला आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगा समक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे सात द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. १०६ व १०७/२०२५-०२, ३६१५ ते ३६१९/२०२५-०५ एकूण ०७ प्रकरणे एस/ 6299 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -९०४, ९२४ व ९२५/२०२५-०३
बोर्ड क्र.३७ ते ३९

श्री. महादेव सत्यभान ठोके, अपिलार्थी
मु. कोळी बोडखा, पो.थेरगांव, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,मो. नंबर-९७६७८२५९५९.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळी बोडखा, ता. पैठण, छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०३.०३.२०२५ (०१) व दि.०४.०३.२०२५ (०२) रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळी बोडखा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,श्रीमती एच. सी. आचले व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. पी. ए. तुपे उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड अ.क्र.	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय/ तपशिल
३७	९०४/२०२५	१७.०९.२०२४	दि.०१ जानेवारी २०२१ ते आजपर्यंत १. आपल्या कार्यालयातील ग्रामसभा रजिस्टर व मासीक सभा रजिस्टरचे यांचे निरिक्षण मिळणेबाबत २. ग्रामसभेचे इतिवृत्त ग्रामपंचायत फलकावर लावले असल्याबाबतचे जिओ टॅगींग फोटोच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत व इतर..
३८	९२४/२०२५	१७.०९.२०२४	जानेवारी २०२१ ते आजपर्यंत या कालावधीतील प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने माहिती अधिकार कलम ४(१)(क) व (ख) अंतर्गत १७ बाबीची माहिती प्रत्येक वर्षी ०१ जानेवारी व १ जुलै रोजी प्रसिध्द करुन ती माहिती आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावावी असे शासनाचे आदेश आहेत. म्हणून आपल्या कार्यालयाने ०१ जानेवारी २०२१ ते आजपर्यंत किती वेळा ही माहिती प्रसिध्द करुन आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावलेली आहे त्याचे जीओ टॅगींग

			फोटोच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात.
३९	९२५/२०२५	१७.०९.२०२४	डिसेंबर २०२१ ते आजपर्यंत या कालावधीतील १४ व १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधितून पुर्ण झालेल्या कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावणे अनिवार्य केल्याचे शासन परिपत्रक नोंदणे २०२१ आहे त्याचा संगणक सांकेतांक २०२१११११७१३३९९२४०१२० असा आहे. परिपत्रकात उल्लेख केलेल्या स्वरुपात फलकाच्या फोटोच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीच माहिती दिलेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही. माझे अक्सीडेंट झाल्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे, माहिती तयार आहे. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने पुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीनही प्रथम अपिलावर दि.२९.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळी बोडखा, ता. पैठण यांनी अपिलार्थीस माहिती अवलोकनाचे पत्र देऊन अवलोकनानंतर अपिलार्थीस हवी असलेली माहिती १५ दिवसाचे आत निशुल्क दयावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत जन माहित अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीच माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोळी बोडखा, ता. पैठण,जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या तीनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रत्येकी ५० पृष्ठांची माहिती अपिलाथी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीनही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. ९०४, ९२४ व ९२५/२०२५-०३/एस/6300 दिनांक :15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -१८३५/२०२५
बोर्ड क्र.४०

श्री. वासुदेव बाबाराव गोजरे, — अपिलार्थी
मु. वडगांव, पो. वडजी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-९४२३७२५१०४.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, वडजी,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०७.०५.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वडजी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती जे. एम. माहोरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. पी. ए.तुपे उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१७.१०.२०२४ रोजी माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय/ तपशिल
मौ. वडजी ता. पैठण येथील घ. नं.२७ ३०X४५ या जागेला दिगंबर अप्पाजी यांचे नाव ज्या कागदपत्राच्या आधारे नोंदवले गेले त्या सर्व कागदपत्राच्या नक्कला, ग्रा. पं. ठराव घेण्यात आला त्याची नक्कल.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अर्धवट माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांना परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली आहे. उर्वरीत माहिती करिता कार्यालयाी दि.११.०१.२०२५ रोजी स्वत: येऊन तपासणी करावी असे कळविले असता ते कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे उर्वरीत माहिती संकलीत करुन अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आपल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वडजी, ता. पैठण, यांनी आठ (८) दिवसाचे आत अपिलार्थी यांना विनाशुल्क माहिती पुरविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा असा निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त असल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अपुर्ण मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना कळविलेली आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरीत माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारुन पोहच दिलेली आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ. १८३५/२०२५एस/6301 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०५५/२०२५

बोर्ड अ.क्र.३४

श्री. रविंद्र दिगंबर शेलार, — अपिलार्थी
मु. पो. लोहगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-८९७५५०८९०१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
चितेगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०३.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चितेगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. एम.डी. भासले व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर श्री. पी. ओ. तुपे, उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०२४ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.०१ जून २०२३ ते दि.३१ ऑगस्ट २०२४ चितेगांव ग्रा. पं. चा लेखाजोखाची खालील मुद्देनिहाय माहिती देणे बाबत. १. ग्राम निधीच्या बँक खात्याचे स्टेटमेंट तसेच खर्चाची माहिती देण्यात यावी. २. १४ वा वित्त आयोग निधी खर्चाची माहिती व बँक खात्याचे स्टेटमेंट देण्यात यावे. ३. पाणी पुरवठा बँक खाते स्टेटमेंट देण्यात यावे. ४. कर वसुली पावती बुक व कंपनी, दुकाने मो. टॉवर, हौसिंग सोसायटया, बँक, हॉस्पीटल वाईन-बिअर शॉप परमिट रुम टोलनाका यांना देण्यात आलेल्या कर मागणी पत्राच्या साक्षांकित प्रती देणे. ५. चितेगांव उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेच्या ईमारतीच्या अंदाजपत्रक प्र.मा कार्यारंभ आदेश मोजमाप पुस्तिकेच्या साक्षांकित प्रती देंणे. ६. ०१ जून २०२३ ते ३१ ऑगस्ट २०२४ या काळात ग्रा. पं. सदस्यांची मासीक सभा व ग्रामसभेच्या प्रोसेडींग देण्यात याव्या.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मला आपली नोटीस प्राप्त झाल्यावर मला कळले की, अपिलार्थी यांना माहिती मिळालेली नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०८.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामविअ/. ग्रामसेवक ग्रामपंचायत चितेगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थीस १५ दिवसात ५० पानाच्या मर्यादीत विनामूल्य रेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्याचा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अभिलेख तपासणीला बोलावून मारहाण करण्याचा कअ रचला होता, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत केले आहे. तथापि जन माहित अधिकारी यांनी कोणीतीही कार्यवाही केली नाही याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,चितेगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.रा.इ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6298 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १९८३/२०२५

बोर्ड अ.क्र.४१

श्री. रविंद्र दिगंबर शेलार, — अपिलार्थी
मु. पो. लोहगांव, ता. पैठण, जिल्हा. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-८९७५५००८९०१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक प्रशासन अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एन.जी.वैष्णव, सहायक प्रशासन अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०५.०२.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.०१ जानेवारी २०२० ते दि.३१ डिसेंबर २०२४ या कालावधीतील पैठण तालुक्यात टंचाई सदृष्य गावात सुरु करण्यात आलेल्या टँकरची माहिती तसेच टँकर चालकाचे नाव आर.सी.बुक, तसेच टँकरच्या गाव निहाय फेऱ्या व टंचाई ग्रस्त गावांची यादी, पंचायत समिती स्तरावर प्राप्त निधी बाबतच्या सर्व माहितीच्या साक्षांकित प्रति देण्यात याव्या.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अर्धवट माहिती दिलेली आहे. ती परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने देय होणारी व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना दि.२०.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माझ्या अर्जावर सुनावणी न घेणे तसेच माझ्या अर्जाला नजर अंदाज करणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२०.०२.२०२५ रोजी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6303 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५७७३,३३५६, ५१९३ व ५१९४/२०२५-०४

बोर्ड अ.क्र.०६,०८ ते १०

श्री. सुभाष परभतराव खमाट,
रा. उमरावती, ता. फुलंब्री,
जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९९९५५३७१६१.

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, उमरावती,
ता. फुलंब्री,जि. छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत, पंचायत समिती, फुलंब्री,
जि. छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२५ (१) दि.२४.०७.२०२५ (१) व दि.१३.११.२०२५ (२) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये एकूण चार द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उमरावती, ता. फुलंब्री,जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती व्हि. पी. डोंगरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंबी, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. प्रसाद समाधान खेडेकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	द्वितीय अपील क्रमांक	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
०६	५७७३/२०२५	०६.०९.२०२५	दि.०७.०८.२०२५ मधील पोस्टाने पाठवलेल्या पत्रातील विषय राज्य माहिती आयोग म. राज्य खंडपीठ छ. संभाजीनगर यांचे द्वितीय अपील क्र.२०१२/२०२३ बाबत कार्यवाही अर्ज बाबत निर्णय दि.०७.०७.२०२५ च्या निर्णयाची व आपल्या कार्यालयाकडून झालेल्या

			कार्यवाहीची माहिती व अर्जदाराने दि.०९.०५.२०२५ रोजी कोणत्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती.
०८	३३५६/२०२५	०४.०४.२०२५	संदर्भ पत्रा विषयी व सोबत जोडलेल्या आज दि.२६.०१.२०२५ रोजी ग्रा.प. उमरावती ता. फुलंब्री ठराव क्र.४ मारुती मंदिर ते जाधव वस्ती/ शिवराम वस्ती शेत वस्ती जोडणारा रस्त्याची स्वत:हस्त लिखीत नकाशा सहित आराखडा नकाशासहित स्थळ पाहणी सहित त्या रस्त्याला सहमती असलेल्या शेत जमीन धारकाच्या सहमतीची संमती पत्रासहीत वस्तुस्थिती सह स्वंय: स्पष्ट पुराव्यासहित माहिती मिळवून देण्यात यावे. मी दिलेल्या दि.०५.०५.२०२१ च्या अर्जावर मौजे उमरावती येथील ग्रामसेकव ५.०५.२०२१ ते आजपर्यंत ग्रामसेवक व इतर यांनी शासनाचा निधी वापरुन अनियोजित जागेत अडचण टाकून प्रवाह बंद केला आहे त्यावर आपल्या कार्यालयामार्फत झालेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती मागितलेली आहे.
०९	५१९३/२०२५	०६.०९.२०२५	मी यापुर्वी दि.०३.०१.२०२५ रोजी दिलेल्या अर्जावर आज पर्यंत झालेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती व दि.१९.०८.२०२५ च्या पत्रानुसार.
१०	५१९४/२०२५	०६.०९.२०२५	मी यापूर्वी दि.०२.०६.२०२५ रोजी दिलेल्या अर्जावर आपल्या कार्यालयाकडून झालेली कार्यवाहीची संपूर्ण माहिती. उपमुख्य कार्यकारी अधिकारी औ. यांचे दि.१९.०८.२०२५ च्या पत्रानुसार.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अगवत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणत्याच प्रकरणात माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने यापुर्वीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कार्यवाही न झाल्याबाबत व अद्याप माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उमरावती, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद चारही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उमरावती, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगरयांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही.

त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच दि.२१.०७.२०२६ रोजी दुपारी ०२.३० वाजता व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह व्यक्तिश: उपस्थित राहून सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे चारही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7216 दिनांक : 08/07/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०३८/२०२५

बोर्ड अ.क्र.११

श्री. सोमिनाथ नारायण सोनवणे, अपिलार्थी
रा. साईनगर चितेगाव पैठण रोडवरचे ता. पैठण,
जि. छत्रपती संभाजीनगर, मो. नंबर-९८९०००२३४०.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खामगांव,
ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१०.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शाळा, खामगांव, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. संजय विठ्ठल सोनवणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर, क्रांती सिताराम धसवाडीकर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोंडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
११	०९.१२.२०२४	फुलंब्री तालुक्यातील खामगाव येथील कैलास नारायण सोनवणे यांनी गोबरगॅस बायोगॅस यंत्रणेची माहिती आम्ही पंचायत समिती फुलंब्री कडून मागविली होती त्यामध्ये त्यांनी घरातील व्यक्तीची संख्या लहान ३ मोठे ३ एकूण ६ व्यक्तीची दाखविले असून त्यामध्ये त्यांचे ४ अपत्ये (दोन मुले दोन मुली) असून त्यांचे नावे(१) कविता कैलास सोनवणे (२) चंद्रकांत कैलास सोनवणे (३) जयश्री कैलास सोनवणे (४) ऋषिकेश कैलास सोनवणे असून यांचे या सर्व ४ अपत्याचे (मुला मुलींचे शिक्षण आपल्या प्राथमिक शाळा जिल्हा परिषद खामगांव, ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाले असून रेकॉर्ड प्रमाणे त्यांच्या टीसीवर जन्म तारखेची नोंद असून त्या

		नोंदीवरुन आम्हाला ४ अपत्यांची) (मुला मुलींचे) नावसहित जन्म तारीख / जन्म तारखेची नोंद लेखी स्वरुपात आपल्या सहीशिक्यासहित साक्षांकित प्रती मध्ये देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, बोगस जन्म तारीख बनविली होती त्याबाबत माहिती मागितलेली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगो त्रयस्थ पक्षाची माहिती मागितलेली होती. त्रयस्थ पक्षाना विचारणा केली असता त्रयस्थ पक्षानी माहिती देण्याबाबत नकार कळविलेला आहे. त्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.२५.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत सुनावणीदरम्यान अपिलार्थीस विचारणा केली असता, याबाबत अपिलार्थी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास देऊ शकलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6291 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३१४५/२०२५

बोर्ड अ.क्र.४५

श्री. अक्षय देविदास भांड, — अपिलार्थी
मु. पो.वडजी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-८००७९९०८८० /८९७५९५२०२५.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वडजी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, गामपंचायत कार्यालय, वडजी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती जे. एम. माहोरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. पी. ए. तुपे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२५.०२.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
ग्रामपंचायत वडजी अंतर्गत १४ व्या वित्त आयोगा मधून सन २०२३-२०२४ या कालावधीत केलेल्या सर्व कामांची माहिती त्यांचे इस्टीमेंट प्रत, अदा केलेल्या बिलाची रक्कम, जी.एस.टी.बिले, वर्क ऑर्डरच्या प्रती देण्यात याव्यात.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अतिरिक्त कामामुळे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत वडजी, ता.

पैठण यांनी अपिलार्थीस मागणी केलेली माहिती नियमाप्रमाणे १० दिवसाचे आत निशुल्क दयावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्याचे आदेशीत करुन प्रथम अपील निकाली काढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुन बुजून मागणी केलेली माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले आहे, असे कारण नमूद केलेले आहे. युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वडजी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6304 6307 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १९०५/२०२५

बोर्ड अ.क्र.१२

श्री. सोमिनाथ नारायण सोनवणे, — अपिलार्थी
रा. साईनगर चितेगाव पैठण रोडवरचे ता. पैठण,
जि. छत्रपती संभाजीनगर, मो. नंबर-९८९०००२३४०.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
गोरक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खामगाव (गोरक्ष),
ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
गोरक्ष माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खामगाव (गोरक्ष),
ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१३.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१२	०९.१२.२०२४	फुलंब्री तालुक्यातील खामगाव येथील कैलास नारायण सोनवणे यांनी गोबरगॅस बायोगॅस यंत्रणेची माहिती ही पंचायत समिती फुलंब्री कडून मागविली होती त्यामध्ये त्यांनी घरातील व्यक्तीची संख्या लहान ३ मोठे ३ एकूण ६ व्यक्तीची दाखविले असून त्यामध्ये त्यांचे ४ अपत्ये (दोन मुले दोन मुली) असून त्यांचे नावे(१) कविता कैलास सोनवणे (२) चंद्रकांत कैलास सोनवणे (३) जयश्री कैलास सोनवणे (४) ऋषिकेश कैलास सोनवणे असून यांचे या सर्व ४ अपत्याचे (मुला मुलींचे शिक्षण आपल्या प्राथमिक शाळा जिल्हा परिषद खामगांव, ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर मध्ये येथे झाले असून रेकॉर्ड प्रमाणे त्यांच्या टीसीवर जन्म तारखेची नोंद असून त्या नोंदीवरुन आम्हाला ४ आपत्याची) (मुला मुलीचे) नावसहित जन्म तारीख / जन्म तारखेची नोंद लेखी स्वरुपात आपल्या सहीशिक्यासहित साक्षांकित प्रती मध्ये देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, बोगस जन्म तारीख बनविली होती त्याबाबत माहिती मागितलेली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते, याबाबत सुनावणीदरम्यान अपिलार्थीस विचारणा केली असता, याबाबत अपिलार्थी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास देऊ शकलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार देय होणार नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.रा.इ

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6292 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०२९८/२०२५

बोर्ड अ.क्र.१३

श्री. शेख तुफैल अख्तर लुतुफुर रहेमान, — अपिलार्थी
रा. भिलपलटन गल्ली, कन्नड, ता. कन्नड,
जि. छत्रपती संभाजीनगर. मो. नंबर-९८६०६५६५१९.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यांपिका,
सारा इंग्लिश स्कुल, कन्नड,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार .असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, सारा इंग्लिश स्कूल, कन्नड, ता.कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती शेख शमीम हुसेनोद्दीन तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीम. मो.सबाहत नईमोद्दीन उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१३	०८.१०.२०२४	सारा इंग्लीश स्कूल कन्नडची शासन परवानगी आदेश व संच मान्यता सत्यप्रत मिळणे

आज रोजी सुनावणीदरम्यांन अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, खाजगी शाळा असून, कायम विना अनुदानीत असल्यामुळे माहिती अधिकार २००५ हा कायदा लागू होत नाही, असे अपिलार्थी यांना दि.१३.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत बसत नाही. या संस्थेस शासनाचे कोणतेही भरीव अनुदान नाही व संस्थेवर शासनाचे नियंत्रण नाही. म्हणून ही संस्था अधिनियमातील कलम 2(h) मध्ये नमूद केलेल्या सार्वजनिक प्राधिकरण या व्याख्येत येत नाही. असा निर्णय अशा संस्थे संदर्भातील अन्य एका द्वितीय अपिलावर यापूर्वीच राज्य माहिती आयोगाने दिलेला आहे. संस्थेस माहिती अधिकार अधिनियम, 2005 हा कायदा लागू होत नाही. ही बाब विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6293 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १९९२/२०२५

बोर्ड अ.क्र.१४

श्री. खंडू बाबुलाल मुगले, — अपिलार्थी
मु. पो. वासडी, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर- ९४०३५३५९०६.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वासडी, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१४	०१.१०.२०२४	१. ग्रा. पं. वासडी, ता. कन्नड येथील दि.१८.११.२०२२ ते दि.०१.१०.२०२४ पर्यंतची झालेल्या मासीक मिटींग, ग्रामसभा, उपस्थिती, प्रोसीडींगचे इतिवृत्त झेरॉक्स. २. ग्रा. पं. अंतर्गत झालेल्या सर्व कामाचे उदा. १५ वा वित्त आयोग, २५/१५ ची निधी, दलीत वस्ती सुधार निधी, विधानसभास सदस्य यांचे निधी ग्रामनिधी व पाणी निधी कामे झालेल्या कामाचे प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक, वर्कऑर्डर, मुल्यांकन प्रमाणपत्राची कामे झालेल्या ठिकानाचे नमूना नं.८ अ इत्यादी सर्व कामाचे जमा खर्च व्हाऊचरचे कृती आराखडा इ. सर्व झेरॉक्स प्रती हवी आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकरी यांनी मला अद्यापपर्यंत कोणतीच माहिती दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत केले आहे. तथापि जन माहित अधिकारी यांनी कोणीतीही कार्यवाही केली नाही याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत कार्यालय, वासडी, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6294 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक -२२३८ ते २२४०/२०२५-०३
बोर्ड क्र.१५ ते १७

श्री. साहेबराव सितारात राठोड — अपिलार्थी
रा.घुसुरतांडा, ता. कन्नड,
जि.छत्रपती संभाजीनगर, मो. नंबर-९८९०२७९३६३.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
पंचायत समिती कार्यालय, कन्नड,
ता. कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि.०५.०६.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वाद सुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
१५	१९.०३.२०२५	सन २०१४-१५ ते २०२४-२५ (आज पावेतो) गृ.ग्रा. पं. घुसूर घुसुर तांडा हद्दीतील १०० टक्के अनुदानातीलसिंचन विहिरीबाबत. रोजगार हमी योजनेतील १०० टक्के अनुदानातील सिंचन विहीरीबाबत साल निहाय १. आलेल्या मागणी अर्जाची अर्जदाराचे नाव गाव पत्ता, विहीरीचा गट नंबर यासह यादी २. ग्रामसभेतील निवड झालेल्या लाभार्थीची नाव गाव, पत्ता, गट नं.सह यादी व मंजूर, ठराव, शासकीय मान्यता, तांत्रिक, अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश व भोगवटा प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत ३. मागणी दाराचे निवड न झालेल्या अर्जदारांची कारणासह यादी ४. सदरील विहीरीचे एम.बी. रेकॉर्ड व कार्यारंभ आदेश अनुदान वितरण विवरण यांचे साक्षांकित प्रत ५. मंजूर व भोगवटा घेतलेल्या विहरींची व लाभार्थी गटाची आजची स्थितीबाबत सविस्तर माहिती.
१६	१९.०३.२०२५	सन २०२३-२६ ते २०२४-२५ (आज पावेतो) गृ.ग्रा. पं. घुसुर घुसुर तांडा हद्दीतील १५ वा वित्त आयोग योजनेतील रोड सिमेंट नाल्या, अंडरग्राऊंड नाल्याबाबत १. काम मंजूर ठरावाची प्रत, २. कामाचे शासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रक, कार्यारंभ आदेश व भोगवटा प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत ३. एम.बी. रेकॉर्ड व देयक अद्यावत

		विवरण प्रत ५. रस्त्याची आजची स्थिती याबाबत सविस्तर माहिती.
१७	१९.०३.२०२५	सन २०२३-२४ ते २०२४-२५ (आज पावेतो) गृ. ग्रा. पं. घुसुर तांडा हद्दीतील इंदिरा आवास योजनेच्या अंतर्गत उक्त कालावधीतील इंदिरा आवास योजनेतील लाभार्थी निवड व लाभ वितरण बाबत साल निहाय १ आलेल्या मागणी अर्जाची अर्जदाराचे नाव गाव पत्ता, मालमत्ता क्र. यासह यादी २. ग्रामसभेतील निवड झालेल्या लाभार्थींची नाव गाव, पत्ता मा.क्र. सह यादी व मंजूरी, ठराव, शासकीय मान्यता, तांत्रिक, कार्यारंभ आदेश व भोगवटा प्रमाणपत्र याची साक्षांकित प्रत ३. मागणीदारांचे निवड न झालेल्या अर्जदारांची कारणासह यादी ४. सदरील घरकुलाचे एम.बी. रेकॉर्ड व कार्यारंभ आदेश अनुदान वितरण विवरण व लाभार्थींचे घरा सोबत काढलेल्या फोटोची प्रत ५. मंजूर व भोगवटा घेतलेल्या घरकुलांची व लाभार्थी गठाची आजची स्थिती याबाबत सविस्तर माहिती.

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती विस्तृत व मोठ्या प्रमाणात आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक दि.०१.०२.२०१७ नुसार दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना माहिती अधिकारातंर्गत पहिल्या ५० पृष्ठांची माहिती विनामूल्य अनुज्ञेय असून उर्वरित माहिती नियमानुसार सशुल्क अनुज्ञेय आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कन्नड,ता. कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या तीनही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलाथी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीनही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.७६२०/२०२२/एस/6295 दिनांक :15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०९६९/२०२५

बोर्ड अ.क्र.-२०

श्री. प्रकाश धर्मा शिसोदे, — अपिलार्थी
रा. फ्लॅट नं.ए.बी-७, एस.एस. पार्क सावंगी हर्सूल,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३१००८.
मो. नंबर- ८८३०३३३१२३.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
शिक्षण विभाग (प्राथमिक),
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०६.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजानामा दिलेला नाही.)

अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

बोर्ड क्र.	माहिती अर्जाचा दिनांक	माहिती अर्जातील विषय
२०	ऑनलाईन	जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांची माहिती पुढील प्रमाणे मिळणेबाबत. शिक्षकांचे नाव, कार्यरत शाळा प्रथम नेमणूक दिनांक, सध्या प्रतिनियुक्ती झालेली आहे काय, प्रतिनियुक्ती कोणाच्या आदेशाने झाली.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विवरणात स्वरुपात मागितलेली आहे. अशा विवरण स्वरुपाची माहिती देण्याची तरतुद नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मला कोणतीही माहिती पुरविलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती ही विस्तृत व्यापक व मोघम स्वरुपाची असून उर्वरीत माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्य व इतर सिव्हिल अपील नं.४६५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे सर्व संबंधितांचे लक्ष वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6296 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २४६६/२०२५

बोर्ड अ.क्र.१८

श्री. रविंद्र दौलतराव गायकवाड, — अपिलार्थी
मु. पो. पळशी (बु.), ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर ९४२२८८३४१३.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पळशी (बु.),
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कन्नड,
जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२९.११.२०२४ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.०८.०२.२०२१ ते माहिती दिनांकापर्यंत पुर्नवसीत मौजे पळशी (बु.), गावात ग्रा. पं. कार्यालय पळशी बु. कडून केलेले व होत असलेले सर्व फेर (न.नं.) नुसार खरेदी केलेले फेर (न.नं.) संदर्भात ग्रा. पं. ला केलेला पुर्व विनंती अर्ज, रजिस्टरी, कोर्ट नोटरी बाँन्ड, संम्मतीपत्र, दानपत्र, ग्रा. पं. पदाधिकारी ओळख संदर्भ शिफारस पत्र यासारखे फेर संदर्भात जमा केलेले सर्व दस्ताऐवजाची छायांकित साक्षांकित प्रति मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास जाणीवपुर्वक टाळाटाळ करणे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना सदर माहितीच्या अवलोकनासाठी कार्यालयीन वेळेत ग्रा. पं. पळशी बु., येथे लेखी पत्र देवून बोलवावे व संबंधितास हवी असलेली माहिती १५ दिवसात देवून कार्यालयास तसे अवगत करावे असा आदेश पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी

अपिलार्थी यांच्या अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नाही. याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात व युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पळशी (बु.), ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पळशी (बु.), ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२१.०७.२०२६ रोजी दुपारी ०२.३० वाजता** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह व्यक्तिश: उपस्थित राहून सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7215 दिनांक : 08/07/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५७७८/२०२५

बोर्ड अ.क्र.१९

श्री. संदिप साहेबराव पाडसवान, — अपिलार्थी
मु. पो. मक्रणपूर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर ९८५०९५७६५७.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मक्रणपूर,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कन्नड,
जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२१.०४.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
सन २०१५ पासून सन २०१७ पर्यंत नमुना नंबर ८ मिळणेबाबत २. सन कालावधीत जागा कोणत्या दस्तऐवजा नुसार नामांतर करण्यात आली ३. १४१ विरुध्द १४०/१, १४०/२,१४०/३, १४०/४,१४०/५ ठराव घेतले बाबतची माहिती व इतर..

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, उडवा उडवीचे तोंडी उत्तर दिलेली आहेत, असे कारण नमूद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रा.प. मक्रणपूर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली व नियमानुसार देय ठरणारी माहिती अपिलार्थी यांना १५ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात यावी, असा आदेश पारित केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नाही. याबाबीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात व युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मक्रणपूर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मक्रणपूर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.१३.०८.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.३० वा. आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना क़ाहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8110 दिनांक : 27/7/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०४५३/२०२५

श्री. भरत बाबुराव डिडोरे, अपिलार्थी
रा. प्लॉट क्र.३/४, हर्सूल पिसादेवी रोड,
पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर- ९६३७११५३६१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहा. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या २८.११.२०२४ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.२०.०७.२०२४ पासून आजपर्यंत या कालावधीतील श्री.बी.बी. डिडोरे यांनी भविष्य निर्वाह निधी अग्रिमसाठी ना-परतावा किंवा अंतिम अग्रिम करीता सादर केलेल्या प्रस्तावासह केलेल्या कारवाईबाबत सर्व दस्तऐवज मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. सक्तीने सेवानिवृत्त झालो आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.११.०२.२०२५ रोजी सुनावणीच्या दिवशी अपिलार्थी यांना १२ पृष्ठांची माहिती सत्यप्रत करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत करुन प्रथम अपिल निकाली काढले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास आली नसलेचे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.११.०२.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता, सदर अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध

करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6286 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५७७२/२०२५

बोर्ड अ.क्र.०५

श्री. सुभाष परभतराव खमाट, — अपिलार्थी
रा. उमरावती, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९९९५५३७१६१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री,
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री,
जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. प्रसाद समाधान खेडेकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंबी, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती उषा मोरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२९.०९.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
राज्य माहिती आयोग, छत्रपती संभाजीनगर जा.क्र. द्वि.अ.३९०० व ३९०१/२०२३/एस/२५७१ दि.२७.०३.२०२५ आदेशानुसार झालेल्या अंमलबजावणीची संपूर्ण माहिती.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मा. आयोगाने आदेशीत केल्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. त्याबाबतची मला कोणतीच माहिती दिलेली नाही. गट विकास अधिकारी साहेबांनी मला सही करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे मी त्या पत्रावर सही केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने यापुर्वीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मा. आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी न केल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम

अपील अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.२१.०७.२०२६ रोजी दुपारी ०२.३० वाजता** व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह व्यक्तिश: उपस्थित राहून सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावंयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.३०.१०.२०२५ रोजी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.7217 दिनांक :- 08/07/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, पंचायत समिती फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगरयांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलाथी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6287 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १७६७/२०२५

बोर्ड अ.क्र.०२

श्री. संजय महादु जंगले, अपिलार्थी
गट क्रमांक १६६ ठरावातील क्रमांक १२३ मु. पो. चिंचोली (नकीम), ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९८९०४५६२९२

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
पंचायत समिती फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०५.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०९.०१.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजना राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ९१ कलम कार्यक्रम अहिल्यादेवी वैयक्तिक सिंचन विहिरीचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या मुळ छायांकित प्रती मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले केले की, मी सध्या नवीन रुजू झालो आहे. आपल्या कार्यालयाची नोटीस प्राप्त झाल्यावर अभिलेखाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांचा विहिरीचा प्रस्ताव अपात्र झालेला आहे. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. त्यांनी नेमकी माहितीची मागणी केल्यास त्यांना नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माझ्याकडे प्रथम अपील दाखल केले नाही, त्यामुळे प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रतिसाद नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४६२१/२०२५

बोर्ड अ.क्र.०३

श्री. रामदास गोडाजी सुरडकर, — अपिलार्थी
रा. वाघलगांव, पो. पिंपळगांव (गांगदेव),
ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-७६२०३३६५८४.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाघलगांव,
ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहा. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०८.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०१.०७.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.१.०१.२०२३ ते दि.०१.०७.२०२५ पर्यंत सर कालावधीतील किती ग्राम सभा झाल्या किंवा घेतल्या, ग्रामसभेत गावचा विकास कामे करण्यासाठी कोणते विषय घेतले.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती तयार करुन अपिलार्थी यांच्याकडे गेलो असता माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. तथापि आज रोजी सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ करत आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीदेण्याच प्रयत्न केलेला तथापि अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारलेली नाही. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती

आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6288 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३३४७/२०२५

बोर्ड अ.क्र.०७

श्री. सुभाष परभतराव खमाट, — अपिलार्थी
रा. उमरावती, ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर-९९७५५३७१६१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहा. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२३.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही.)

अपिलार्थी यांनी दि.११.०३.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.१६.०२.२०२४, दि.१८.०३.२०२४ रोजी केलेल्या अर्जावर आजपर्यंत झालेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आढळून आलेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याबद्दल, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात पूर्ण करावी व या कार्यवाहीचा अंतिम निष्कर्ष अपिलार्थी यांना कळविण्यात यावा.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊन माहिती उपलब्ध न झाल्यास अशा माहिती संदर्भातील अभिलेख जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द **(अभिलेखाचा जतन कालावधी विचारात घेऊन)** मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफआयआर दाखल करावा, अशी त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) नुसार शिफारस करण्यात येत आहे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6290 दिनांक : 15/6/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २११५/२०२५

बोर्ड अ.क्र.४२

श्री. कमलाकर देविदास वानोळे, अपिलार्थी
रा. घर नं.१ (एक), हिवरा चौंढाळा, तसेच रेणुका देवी गल्ली,
पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-९७९०७५५७७४.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालया, चिंचाळा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर .

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एन.जी.वैष्णव, सहायक प्रशासन अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचाळा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती एच.सी.आचले व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. पी. ए. तुपे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०४.१२.२०२४ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
सन २०२२ ते २०२३ या कालावधीतील मौजे हिवरा चौंढाळा ता. पैठण येथील घर मिळकत क्र.१ (एक) च्या बाबतीत सहायक धर्मादाय आयुक्त साहेब छ. संभाजीनगर येथे प्रकरण चौकशी क्रं.५८९/२०२३ ग्रामपंचायतीने दिलेले कागदपत्रे खरे आहेत की नाही याबाबत लेखी माहिती देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही. ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अतिरिक्त कामामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आज रोजी अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आपल्या

आदेशानुसार अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहित अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचाळा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी नियमाप्रमाणे अपिलार्थीस १५ दिवसाचे आत निशुल्क (५० पानाच्या मर्यादेपर्यंत) देवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा असा निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारुन माहिती मिळाल्याबाबतची पोच दिलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6304 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २७३५/२०२५

बोर्ड अ.क्र.४३

श्रीमती आरती सचिव चव्हाण, — अपिलार्थी
रा. थापटी तांडा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-८८८८५२३८५०.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, हिरापूर-थापटीतांडा,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी,
पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२७.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिरापूर-थापटीतांडा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती सी. एम. गव्हाणे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. पी. ए. तुपे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२२.०४.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
प्लॉट निर्मीती पासून आजपावेतो या कालावधीतील, १. मौजे थापटी तांडा येथील सहान /जागा/प्लॉट क्र.५६ हा प्रताप शाहु राठोड यांच्या नावे घेण्यात आली आहे त्याबाबत ग्रामपंचायतचा ठराव व प्रोसेडींगच्या साक्षांकित प्रती २. श्री. प्रताप शाहु राठोड यांनी मौजे थापटी तांडा सहान जागा/ प्लॉट क्र.५६ त्यांच्या नावावर लावण्यासाठी दिलेले अर्ज/खरेदीखत/नोटरी/बीड व त्यासोबत जोडण्यात आलेले दस्ताऐवजाची छायांकित साक्षांकित प्रत. ३. मौजे थापटी तांडा सहान जागा, प्लॉट क्र५६ यांचे निर्मीती पासून आजपावेतो नमुना क्र.८ च्या चुर्तुसिमा क्षेत्रफळ नमुद असलेल्या प्रती, ४. मौजे थापटी तांडा सहान जागा/प्लॉट क्र.५६ च्या निर्मीतीपासून आजपावेतो हस्तांतरीत केल्याचे फेरफार नक्कल ५. मौजे थापटी तांडा सहान जागा/प्लॉट क्र.५६ ची आजरोजी फेर लावण्यासाठी आलेले अर्ज व खरेदीखताच्या छायांकित प्रत ६. एखाद्या व्यक्तीच्या नावे असलेले प्लॉट किंवा सहान जागा इतराच्या नावे करण्यासाठी लागणारे दस्ताऐवजाची यादी (नियमावली प्रमाणे) वरील सर्व माहिती साक्षांकित करुन दयावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.३०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसे गट विकास अधिकारी यांना माहितीस्तव सादर केलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, हिरापूर, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी नियमाप्रमाणे अपिलार्थीस १५ दिवसाचे आत माहिती निशुल्क देण्याचे आदेशीत करुन, प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6305 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २८९०/२०२५

बोर्ड अ.क्र.४४

श्री. अंबादास उध्दव कानडे, अपिलार्थी
मु. पो. चांगतपुरी, ता. पैठण,जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-९८८१३२५६२३.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा, चांगतुरी,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०९.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शा.चांगतपुरी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. संजय लक्ष्मणराव खोरुडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. मनोज ताराचंद चव्हाण उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१२.०४.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
सन २०२४-२०२५ या कालावधीतील जिल्हा परिषद शाळेमधील शिक्षक मुख्यालय राहत असलेले करारनाम्याची प्रत व घरभाडे भत्ता मिळणेसाठी दाखल केलेल्या सर्व कागदपत्राची छायांकित प्रत मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही व माहिती दाखवण्यात आलेली नाही. ती परिपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी यांनी प्रत्यक्षात कार्यालयाकडे अद्याप व्यक्तिश: संपर्क केला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपिलार्थी यांना देण्यासाठी माहिती एक संच आज रोजी सोबत आणलेला आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी

यांना देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये व्यक्तिश: माहिती घेणार असे नमूद केल्याचे दिसून येत आहे. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगा समक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6306 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३२०५/२०२५

बोर्ड अ.क्र.४६

श्री. रामनाथ एकनाथ केदारे, — अपिलार्थी
रा. राहुलनगर (कातपूर), ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-८२०८३४८८४४.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
विस्तार अधिकारी (सांख्येकी),
पंचायत समिती, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१७.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्येकी), पंचायत समिती, पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. अनिल ह. वडते उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१९.०३.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.२५.०४.२०२४ ते आज तागायत या कालावधीतील उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.जिपछस/मगाराग्रारोहयो/ तक्रार/ कावी/२०२४/८६/ दिनांक २५.०४.२०२४.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अतिरिक्त कामामुळे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. काही कालावधी दिल्यास अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्येकी), पंचायत समिती, पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी,पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशांत

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6308 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३३०५/२०२५

बोर्ड अ.क्र.४७

श्री. अबरार गुलामनबी कुरेशी, — अपिलार्थी
मु. पो. नेहरु चौक, पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-९८२२६२४९९५.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कारकीन,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. इंगोले व्ही. व्ही. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत, पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर श्री. तुपे पि. ए. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०८.०५.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
कार्यालयीन अभिलेखा नुसार दि.२०.१०.२०२३ ते दि.२७.१०.२०२३ पर्यंत कारकीन ग्रा. पं. हद्दीतील मिळकत नं.३३५/२ साठी रमेश लक्ष्मण मुळे यांनी त्यांचा दि.२०.१०.२०२३ रोजी त्यांना बांधकाम परवानगी दिली. त्या परवानगी मागणी केली व आपले कार्यालयाने दि.२७.१०.२०२३ रोजी त्यांना बांधकाम परवानगी दिली. त्या परवानगीसाठी संबंधिताने सादर केलेल्या संपूर्ण बांधकाम परवानगीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांचे संचिकाची प्रत देण्यात यावी. सदरील मिळकत ही शेत जमिन असून या जागेचे एन.ए.आदेशाची प्रत, तसेच त्यांनी सादर केलेली चतु:सिमा आपण प्रत्यक्ष पाहणी करुन बांधकाम परवानगी दिली त्याबाबतचे आपले स्थळ पाणी पंचनामा प्रत देण्यात यावी. तसेच सदरील मिळकती बाबतचा वाद मा. न्यायालयात चालू असतांना बांधकाम परवानगी देण्यात आली त्याबाबत मा. न्यायालयाचे आदेश असल्यास त्याची माहिती देण्यात यावी. सदरील बांधकाम परवानगी ज्या ग्रामविकास अधिकारी यांचे स्वाक्षरीने दिली त्यांचे संपूर्ण नाव व पदनाम देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला अर्धवट

माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर मागणी केलेल्या परिपुर्ण माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना देय होणारी माहिती दि.१४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.११.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कारकीन, ता. पैठण यांनी अपिलार्थीस १५ दिवसाचे आत निशुल्क दयावी (५० पानाच्या आत निशुल्क) व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा असा आदेश पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जाणुन बुजुन मागणी केलेली संपूर्ण माहिती मिळण्यापासून वंचित ठेवले आहे, असे कारण नमूद केलेले आहे. युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती अथवा उपलब्ध वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास याबाबत संबंधीत प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6309 दिनांक : 25/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९०९/२०२५

बोर्ड अ.क्र.५३

श्री. ज्ञानेश्वर भानुदास नवथर, — अपिलार्थी
रा. इंदेगांव, पो. विहामांडवा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर-८२६१९१२०१५.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इंदेगांव,
ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, इंदेगांव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. आर. एस. तांबे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्री. पी. ए. तुपे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२८.०५.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.०१.०४.२०२२ ते दि.०१.०४.२०२५ या कालावधीतील आपल्या ग्रामपंचायत कडून १४ व्या वित्त आयोगातून कामाचे अंदाजपत्रक परिपुर्ती देयकांची प्रत यासाठी वापरण्यात आलेल्या पासबुकाची छायांकित प्रत, यासाठी ग्रामपंचायत ने घेतलेल्या ठरावाची प्रत, छायांकित प्रत माहिती २००५ कार्यालयीन पुरवण्यात येणाऱ्या छायांकित प्रतिवर जन माहिती अधिकारी यांच्या सही व शिक्का व पान क्रमांक नमूद करुन देण्यात यावी, चालू पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामपंचायतीने वेळोवेळी घेतलेल्या जनरल बॉडीच्या (ग्रामसभेत) बैठकीत घेतलेल्या निर्णयाची प्रोसिडींग रजिस्टरची छायांकित प्रत माहिती अधिकार २००५ नुसार जन माहिती अधिकारी यांच्या सही शिक्यासह व पत्रक्रमांक नमूद करुन कार्यालयीन पत्यासह माहिती दयावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे अवलोकनासाठी बोलावले असता, कार्यालयात माहितीचे अवलोकन दिलेले नाही. मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती देण्यासाठी माहितीचा एक संच आज रोजी सोबत आणलेला आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१८.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत इंदेगांव, ता. पैठण यांनी अपिलार्थीस नव्याने अवलोकनासाठी तारीख कळवून अपिलार्थीस आवश्यक ती शुल्क घेवून माहिती उपलब्ध करुन दयावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. तसेच आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आली व अपिलार्थी यांनी ती आयोगा समक्ष स्विकारुन पोहच दिलेली आहे. ही बाब विचारात घेता, अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6310 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ६०६४/२०२५

बोर्ड अ.क्र.५४

श्री. सोमनाथ मच्छिंद्र राऊत, — अपिलार्थी
रा. लिंबगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर,
मो. नंबर- ९३०९१९१२१४.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३१.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती एच.सी. आचले व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजनीगर, श्री.पी. ए. तुपे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२८.०८.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
दि.०१ एप्रिल २०२१ पासून ते दि.०१ ऑगस्ट २०२५ पर्यंत या कालावधीतील मा. जन माहिती अधिकारी ग्रा. लिंबगाव ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर सदर ग्रामपंचायतीचे ०१.०४.२०२१ पासून ०१.०८.२०२५ पर्यंतचे ठराव नोंद वही (रेकॉर्ड बुक) मासिक ग्रामसभा, विशेष ग्रामसभा मध्ये झालेले सर्व निर्णय व ग्रामपंचायतीला सार्वजनिक कामासाठी वित्त आयोगाकडून किती निधी आलेला आहे. व संबंधित निधी कशाप्रकारे खर्च केलेला आहे. वरील कलावधीत ग्रामपंचायतीसाठी कोण-कोणत्या योजनेमार्फत किती निधी आलेला आहे. याबाबत माहिती दयावी व तो कोण-कोणत्या कामासाठी खर्च केला आहे. व वरील कालावधी ग्रामपंचायतीचे बँक खाते मधील झालेल्या सर्व व्यवहाराच्या सत्यप्रती दयाव्यात. आणि वरील कालावधीत ग्रामपंचायतीने घेतलेले सर्व ठराव व काढलेले फेरबदल याबाबत माहिती व सदरील ग्रामपंचायतीमध्ये महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत सार्वजनिक कामासाठी किती निधी मंजूर झालेला आहे. व कोणत्या कामासाठी किती खर्च झाला आहे. या बाबत सविस्तर माहिती दयावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीबाबत कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन करावे व चिन्हांकीत केलेली माहिती नियमाप्रमाणे देण्यात येईल, असे कळविले असता अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

आज रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०७.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबगांव, ता. पैठण, यांनी अपिलार्थीस १५ दिवसाचे (५० पानाच्या पर्यंत) आत निशुल्क दयावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा, असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. या बाबीची आयोगाने गंभीर दखल घेतलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, लिंबागाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6311 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४५०१/२०२५

बोर्ड अ.क्र.५५

श्री. समाधान नारायण काळे, — अपिलार्थी
मु. पो. खामगांव, ता. फुलंब्री,
जि. छत्रपती संभाजीनगर-४३११५१
मो. नंबर-७७०९५४९४५१.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
विस्तार अधिकारी (सांख्येकी),
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०१.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्येकी), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, अनिले ह. वडते उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१८.०७.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
मनरेगा योजनेअंतर्गत खेडा ग्रामपंचायती मधील सोमनाथ शिंदे ते रुद्रप्रताप शिंदे या रस्त्याच्या कामासंबंधीत माहिती मिळणेबाबत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तसे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केल्याप्रमाणे आयोगाच्या पटलावर पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्येकी), पंचायत समिती, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी.यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6312 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २८८४/२०२५

बोर्ड अ.क्र.५७

श्री. रायभान किसन उघडे, — अपिलार्थी
रा. १४०, रामकृपा कॉलनी (म्हाडा),
दर्गा रोड, छत्रपती संभाजीनगर
मो. नंबर- ९३७१३७०७१३.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक प्रशासन अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत),
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम-१९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर, श्री. संजय कारभारी दारवंटे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२७.०३.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश बोर्ड क्र.१४ तक्रार क्र.०६/२०२२, द्वितीय अपील क्रमांक :- ०७९९,८०५, ८०६,८०७,१०५४,१०५९,१०६०,१६४४,१६४७,१६४८,१६५८,२५१४,२५१५, २५२१, २७८८, ३२८१ ते ३२९०/२०२० एकूण २५ अपीले दि.११.०९.२०२१ आपले पत्र चे पत्र क्र.मा.अ./कावि/२०९/७६८ दि.१२.०३.२०२५ वरिल अपिला सोबतचे ८ 'अ ' तील मूळ अर्ज (जोडपत्र) च्या संपूर्ण प्रति, तसेच अर्ज व अपिल निहाय वेगवेगळी माहिती न्यायालयीन कामासाठी व ता. पैठण, जि. छ.संभाजीनगर येथील न्यायालयात दि.दावा क्र.७०/२०१५, ७६/२०१८, ७७/२०१८ सदर माहितीची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे संपूर्ण माहिती अचुकपणे प्रमाणीत करुन देण्यात यावी.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या एकूण २५ अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने आदेशीत केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना दि.१२.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये एकूण २८ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्यापी माहिती अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.१२.०३.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्यासंदर्भात पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6314 दिनांक : 15/6/2026

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०४६२/२०२५

बोर्ड अ.क्र.५८

श्री. दिपक नामदेव वाघमारे, अपिलार्थी
रा. मेथी, ता. मुखेड, जि. नांदेड,
मो. नंबर-७५०७६८०७९७.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, मुखेड, जि. नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप विभागीय पोलीस अधिकारी,
उप विभाग, देगलूर, जि. नांदेड

(सुनावणी दिनांक २३.०४.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२७.०१.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी, श्री. गोपाळ दिगंबर सुर्यवंशी, पोलीस उपनिरिक्षक, पोलीस स्टेशन, देगलूर, उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. अभिजीत ग. तुतुरवाड, पोलीस उपनिरिक्षक, पोलीस स्टेशन मुखेड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१४.११.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
पोलीस अधिक्षक साहेब अनु. जाती आयोग, आय.जी. साहेब, जिल्हाधिकारी साहेब व मानव अधिकार आयोग यांच्याकडे दि.१२.११.२०२५ रोजीचे तक्रार अर्ज व उपोषण पुर्वीच्या तक्रारी अर्जावर कोणती कार्यवाही केली व दि.११.११.२०२५ संध्याकाळी ६ ते १० वाजेपर्यंतची पोलीस स्टेशन मुखेड येथील C.C.T.V. फुटेज जे मला मारहाण केली ते मिळणे, व केलेल्या कार्यवाहीचे उत्तर तक्रारी नंतर मिळणे न करण्याचे कारण याची पण माहिती देणे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने दि.०६.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये, पोलीस स्टेशनचे सी सी टी व्ही फुटेज आपण मागणी केलेली आहे. सदरचे फुटेज आपल्याला नियमानुसार देता येत नाही असे कळविण्यात आलेले अहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, कलम ८(३) नुसार माहिती अधिकार कायदयानुसार नाकारण्यात येते असा निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी ठेवली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांचे लेखी निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केले आहे. सदर निवदेनात त्यांनी माहिती मिळाली नाही, माहिती मिळवून दयावी अशी विनंती केलेली आहे. युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात व लेखी निवेदनात तथ्यांश दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष पोलीस महासंचालक, मुंबई महाराष्ट्र राज्य यांचेकडील, क्रमांक : पोमसं/ २१/ मा.अ.द्वि.अपि.भोजने/रामाआ८/अम.खंडपीठ/१०६/(१३)/ २०२१, दिनांक : ०६.०९.२०२१ या परिपत्रकाकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त परिपत्रक विचारात घेता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय बाजूला सारण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, मुखेड, जि. नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (अपिलार्थी यांच्याशी संबंधित सी.सी.टी.व्ही. फुटेजची माहिती) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. उप विभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग, देगलूर, जि. नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6315 दिनांक : 15/6/2026